सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय,

शासकीय तंत्र निकेतन परिसर, गाडगे नगर, अमरावती ४४४ ६०३

E-mail:-roamravati.dte@gmail.com Ph.No. :(०७२१) २५७३०२७, २५७२५७७

Website: www.jdroamt.org Fax No. : (०७२१) २५७ ७९१३

क्रमांक :- विकाअ/शिक्षण/स्थापत्य प्रकल्प /२०११/२६४३

दिनांक :- ०५ डिसेंबर २०११.

प्रति,

प्राचार्य,

शासकीय / अनुदानित / विना-अनुदानित,

अभियांत्रिकी महाविद्यालय / तंत्रनिकेतन,

अमरावती विभाग. **(ज्या संस्थेत स्थापत्य अभियांत्रिकी शाखा आहे, त्यांचे करीता)**

विषय :- अमरावती विभागातील ५ जिल्हयातील सर्व गावांमध्ये नाला सर्वेक्षणाची (नाला सरळीकरण, रुंदीकरण, खोलीकरण) कामे स्थापत्य अभियांत्रिकीचे विद्यार्थ्यांकडून प्रोजेक्ट अंतर्गत करुन घेण्याबाबत.

संदर्भ :- मा. विभागीय आयुक्त यांचे दि. ५/१२/२०११ मधील सभेतील प्राप्त निर्देश.

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, अमरावती विभागातील ३९५७ गांवातील व नजिकचे परिक्षेत्रातील विहीरीतील पाण्याची पातळी वाढविण्याकरीता शासनाव्दारे उपक्रम हाती घेण्यात आला आहे. यामुळे शेती सिंचन, पिण्यांकरीता, वापराकरीता पाणी उपलब्ध होऊन गावातील नागरीकांचे उत्पन्न वाढ, जीवनाचा स्तर उंचावण्याकरीता मदत होईल. याकरीता विभागातील प्रत्येक गावातील नाले सरळीकरण, रुंदीकरण व खोलीकरण करुन त्या नाल्यांवर सिमेंट बंधारा बांधणे व त्यास up-stream व down-stream बाजूला कुशनिंग लावणे प्रस्तावित आहे.

करीता स्थापत्य अभियांत्रिकीचे विद्यार्थ्यांकडून त्यांचे शैक्षणिक प्रकल्पांतर्गत सदर प्रस्तावातील सर्वेक्षण करुन घेणे व ईतर संबंधीत ड्रॉईंग (estimate) तयार करुन देणेचे काम अपेक्षीत आहे. सदर काम फेब्रुवारी ते मार्च २०१२ या दरम्यान करायची आहेत.

तेव्हा ज्या संस्थेत स्थापत्य अभियांत्रिकी अभ्यासक्रम आहे व विद्यार्थी तिस-या / चौथ्या वर्षाला आहेत (Syllabus मध्ये Project आहे). त्या संस्थांना कळविण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी **दिनांक ८/१२/२०११ रोजी सकाळी ११.०० वाजता या कार्यालयात सभा आयोजित केली आहे.** याकरीता प्राचार्य व विभाग प्रमुख, स्थापत्य अभियांत्रिकी यांनी विद्यार्थी संख्या/ त्यात विद्यार्थी / विद्यार्थीनी किती व ईतर संबंधीत माहितीसह उपस्थित रहावे.

(प्र.वि. सरोदे)

सहसंचालक तंत्रशिक्षण,

अमरावती.

प्रत :- १) मा. विभागीय आयुक्त, अमरावती (लक्षवेध :- श्री. कामुने, उपायुक्त) यांना माहिती व योग्य कार्यवाहीस्तव सादर.

२) प्रक्रिया योजक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळी टाकण्याकरीता.

E:\All Letters Manish.doc

Created with nitroPDF professional
download the free trial online at nitropdf.com/professional